173

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र. पोमसं /३६/ र.वका.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०१/२०२३, मुंबई, दिनांक २३ /१० /२०२३

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र.सीसीटी-३६१५/ प्र.क्र.१३०/पोल-३, दिनांक ११.१०.२०२३

**विषय :-** राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी निधी वितरीत करण्याबाबत.

******

**परिपत्रक**

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, निर्णय क्र.सीसीटी-३६१५/ प्र.क्र.१३०/पोल-३, दि.११.१०.२०२३ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२३१०१११४४७१००१२९ असाआहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

( प्रविण शिखरे)
पोलीस महासंचालक यांचे उपसहायक (र. व का.)
पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे करिता.

प्रति,

अपर पोलीस महासंचालक ( नियोजन व समन्वय ),महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सहायक पोलीस महानिरीक्षक (नियोजन व समन्वय ), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यासनअधिकारी, का.क्र.१७ व २१

प्रत -

पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई.

२/- पोलीस उप अधीक्षक यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके मध्ये "वित्त व लेखा" या मथळया खाली प्रकाशित करण्यात यावा.



Scanned with CamScanner

राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी निधी वितरीत करण्याबाबत.

# महाराष्ट्र शासन
## गृह विभाग
### शासन निर्णय क्रमांकः सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-२/पोल-३

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ११ ऑक्टोबर, २०२३.

<u>वाचा</u> :-

१. मा उच्च न्यायालय, मुंबई यांचे क्रिमिनल रिट पिटीशन क्र.२११०/२०१४ वरील दि.१३.०८.२०१४, दि.२१.१०.२०१५, दि.२४.०२.२०१६, दि.२१.०९.२०१६ व दि.३०.११.२०१६ रोजीचे आदेश.

२. मा. सर्वोच्च न्यायालयाचे क्रिमीनल रिट पिटीशन क्र.५३९/१९८६ वरील दि.२४.७.२०१५ रोजीचा न्यायनिर्णय.

३. सचिव, माहिती तंत्रज्ञान संचालनालय, मुंबई यांचे पत्र क्र.संकीर्ण-२०१२/प्र.क्र.३७/१८,दि.०४.०३.२०१३.

४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं / २१ / ७२७२ / न्या.प्र. सीसीटीव्ही / २०३ / २०१४, दि.२७.०१.२०१५.

५. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/पोल-३, दि.२३.११.२०१५.

६. शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. भांखस-२०१४ / प्र.क्र.८२ / भाग ॥। / उद्योग - ४, दि.३०.१०.२०१५ व दि.०१.१२.२०१६.

७. शासन निर्णय, सामान्य प्रशासन (माहिती व तंत्रज्ञान) विभाग क्र. मातंसं - १७१६ - ३६१५ / प्र.क्र.२८६ / ३९, दिनांक ०९.०८.२०१६.

८. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-१/पोल-३,दि.०६.०१.२०१७.

९. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/पोल-३, दिनांक २६.०३.२०१८.

१०. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.१४४/२०१८/कोषा.प्रशा-५,दि.२८.०९.२०१८.

११. महा-आयटी कॉर्पोरेशनचे पत्र क्र.MahaIT/PRJ/०३९/०१/२०१८, दि.२४.०७.२०१९.

१२. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/पोल-३, दिनांक १४.११.२०१९.

१३. शासन निर्णय, गृह विभाग क्र.सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/पोल-३, दिनांक ११.१२.२०१९.

१४. शासननिर्णय,गृहविभागक्र.सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-३/पोल-३,दि.१७.०१.२०२२.

१५. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-४/पोल-३, दि.१२.१२.२०२२.

१६. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-४/पोल-३, दि.२१.०३.२०२३.

१७. शासन निर्णय, गृह विभाग क्र. सीसीटी-३६१५/प्र.क्र.१३०/भाग-५/पोल-३, दि.५.७.२०२३

१८.मे. सुजाता कम्प्युटर्स प्रा. लि. यांचे दि.१६.१.२०२३ रोजीचे देयक.

१९. मे. प्राईस वॉटर हाऊस कूपर्स कंपनी यांचा दि.३०.०५.२०२३ रोजीचा अहवाल.

२०. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांचे पत्र क्र.पोमसं/१७/६१६२/पो.ठाणे सीसीटीव्ही प्रकल्प/७७/२०१९-२३, दि.७.६.२०२३.

**<u>प्रस्तावना</u> :-**

मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याबाबत उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.२७.०२.२०१८ रोजीच्या बैठकीत रु.७२.६० कोटी खर्चास मान्यता देण्याबाबतची शिफारस करण्यात आली होती, त्यानुषंगाने गृह विभाग शासन निर्णय दि.२६.०३.२०१८ नुसार रु. ७२.६० कोटी खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. तसेच सदर पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याची कार्यवाही महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळामार्फत करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला होता.

उच्चस्तरीय शक्ती प्रदत्त समितीच्या दि.१३.११.२०१९ रोजीच्या बैठकीतील निर्णयानुसार संदर्भ क्र.१२ येथील शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी येणाऱ्या रु.११० कोटी (सर्व कर व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाच्या सेवाशुल्कासह) एवढ्या सुधारीत खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. तसेच संदर्भाधीन क्र.१३ येथे नमूद दिनांक ११.१२.२०१९ च्या शासन निर्णयान्वये राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे काम हे महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान महामंडळामार्फत न करता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्यामार्फत करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

राज्यातील एकूण १०८९ पोलीस ठाण्यांपैकी मे सुजाता कम्प्युटर्स प्रा. लि. यांनी ६ झोन मधील ७९२ पैकी ३९७ व मे. जावी सिस्टिम इंडिया प्रा. लि. यांनी ३ झोन मधील २९७ पैकी १५० असे एकूण ५४७ पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम पूर्ण केल्यामुळे शासन निर्णय, गृह विभाग दि.१७.०१.२०२२ अन्वये राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये मा. न्यायालयाच्या आदेशानुसार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रकल्पाचे पुरवठादार मे. सुजाता कम्प्युटर्स प्रा. लि. यांना अदा करावयाचे रु.१७,५६,०३,६८०/- (जीएसटी सह) व मे. जावी सिस्टिम इंडिया प्रा. लि. यांना अदा करावयाचे रु.५,८९,६२,२२६/- (जीएसटी सह) असा एकूण रु.२३,४५,६५,९०६/- इतका निधी वितरीत करण्यात आला आहे. तसेच संदर्भ क्र.१५ येथील शासन निर्णयान्वये मे.सुजाता कम्प्युटर्स प्रा. लि. यांनी Phase-II मधील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे उर्वरित ५०% काम केल्यामुळे सदर प्रकल्पाच्या RFP मधील तरतूदीनुसार Revised CAPEX Cost च्या १०% Mobilization Advance सह झोन क्र.६ (पुणे) साठी रु. २,१२,१५,६१५/- व झोन क्र.९ (नाशिक) साठी रु.४,०८,२०,९३६/- अशी जीएसटी सह एकूण रु.६,२०,३६,५५१/- इतकी रक्कम वितरीत करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. गृह विभागाच्या संदर्भ क्र. १६, दि. २१.३.२०२३ शासन निर्णयान्वये अन्वये मे. सुजाता कॅम्प्युटर्स यांनी झोन क्र.८ (मुंबई) मधील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम पूर्ण केल्यामुळे Phase-I Difference-४०% of CAPEX, Phase-II ४०% on CAPEX व Mobilization १०% of CAPEX यासाठी प्रकल्पाच्या RFP मधील तरतुदीनुसार रु. १०,६८,२११/- इतका दंडात्मक शुल्क वजा करुन जीएसटीसह एकूण रु. ३,७२,६१,००८/- इतका निधी वितरीत केला आहे.

मे.सुजाता कम्प्युटर्स प्रा.लि.यांनी झोन क्र.१ (नागपूर) बाबत प्रकल्पाच्या RFP मधील तरतूदीनुसार 10% Mobilization Advance करीता ॲडव्हान्स बँक गॅरेंटी सादर करणे आवश्यक होते. परंतु पुरवठादाराने ॲडव्हान्स बँक गॅरेंटी दिली नसल्याने त्यांना 10% Mobilization Advance ची रक्कम देण्यात आली नाही. आता सदर झोनचे काम पुर्ण झाल्याने मे. सुजाता कम्प्युटर्स प्रा. लि. यांना Revised CAPEX Cost च्या 10% Mobilization Advance म्हणून झोन क्र.१ (नागपूर) साठी रु. ८४,४२,५७६/- इतकी रक्कम अदा करणे आवश्यक असल्याचे अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांनी संदर्भाधिन क्र. २० येथील पत्रान्वये कळविले असून प्रकल्पाचे सल्लागार मे. पीडब्ल्युसी

यांच्या दि.३०.५.२०२३ रोजीच्या अहवालातील अभिप्रायानुसार तसेच संबंधीत जिल्ह्याच्या जिल्हास्तरीय समित्यांनी पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही लावण्याचे काम पूर्ण व समाधानकारक झाल्याबाबतचा अहवाल पोलीस महासंचालक कार्यालयास सादर केला त्यानुसार वरील रक्कम देय आहे.

मे. सुजाता कम्प्युटर्स प्रा. लि. यांनी झोन क्र.१ (नागपूर) मधील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम पुर्ण केल्यामुळे Phase-I Difference-40% of CAPEX, Phase-II 40% of CAPEX व Mobilization 10% of CAPEX यासाठी रु.४,४२,३३,९००/- इतक्या रकमेचे देयक सादर केले आहे. अपर पोलीस महासंचालक (नि. व स.), पोलीस महासंचालक कार्यालय, मुंबई यांनी संदर्भ क्र.१९ येथील पत्रान्वये Phase-I Difference-40% of CAPEX, Phase-II 40% of CAPEX व Mobilization 10% of CAPEX यासाठी पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याच्या कामात विलंब झाल्यामुळे RFP मधील तरतुदीनुसार रु.३३,७७,०३१/- जीएसटीसह इतका दंडात्मक शुल्क आकारण्यात आला असून रु.३,७९,०२,७२४/-इतकी रक्कम देय असल्याचे कळविले असून प्रकल्पाचे सल्लागार मे. पीडब्ल्युसी यांच्या दि.३०.५.२०२३ रोजीच्या अहवालातील अभिप्रायानुसार तसेच संबंधीत जिल्ह्याच्या जिल्हा स्तरीय समित्यांनी पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही लावण्याचे काम पूर्ण व समाधानकारक झाल्याबाबतचा अहवाल पोलीस महासंचालक कार्यालयास सादर केला त्यानुसार वरील रक्कम देय आहे.

राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रकल्पाचे पुरवठादार मे. सुजाता कम्प्युटर्स प्रा. लि. यांनी झोन क्र.१ (नागपूर) मधील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम पुर्ण केल्यामुळे वरीलप्रमाणे Phase-I Difference-40% of CAPEX, Phase-II 40% of CAPEX व Mobilization 10% of CAPEX बाबतचे देयक अदा करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती. या अनुषंगाने शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

राज्यातील पोलीस ठाण्यांमध्ये मा. न्यायालयाच्या आदेशानुसार सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यासाठी प्रकल्पाचे पुरवठादार मे. सुजाता कम्प्युटर्स प्रा.लि. यांनी झोन क्र.१ (नागपूर) मधील पोलीस ठाण्यांमध्ये सीसीटीव्ही बसविण्याचे काम पुर्ण केल्यामुळे Phase-I Difference-40% of CAPEX, Phase-II 40% of CAPEX व Mobilization 10% of CAPEX यासाठी प्रकल्पाच्या RFP मधील तरतूदीनुसार रु. ३३,७७,०३१/- (जीएसटीसह) इतका दंडात्मक शुल्क वजा करुन एकूण जीएसटीसह **रु.३,७९,०२,७२४/- (रुपये तीन कोटी एकोणऐंशी लाख दोन हजार सातशे चौवीस फक्त)** इतकी देय रक्कम वितरीत करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर रक्कमेची देयके अदा करतांना आयकर व अंमलात असलेले कर वजाती करुन अदा करण्यात यावे.

३. प्रस्तुत प्रकरणी उपरोक्त प्रमाणे होणारा खर्च हा “मागणी क्र.बी-१०, ४०५५ - पोलीस यावरील भांडवली खर्च, ८०० इतर खर्च, (००) (०९) सीसीटीव्ही संनियंत्रण यंत्रणा बसविणे (४०५५ ०२२३) या अंतर्गत ५२-यंत्रसामग्री व साधनसामग्री” या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व तो सन २०२३-२०२४ या वित्तीय वर्षासाठी उपलब्ध असलेल्या अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर निधी कोषागारातून आहरित करण्यासाठी पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना नियंत्रण अधिकारी व त्यांच्या अधिनस्त आहरण व संवितरण अधिकाऱ्याला आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषीत करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दि.१८.४.२०१७ ला अनुसरुन प्रशासकीय विभागांना असलेल्या अधिकारान्वये तसेच वित्त विभागाचा शासन निर्णय क्र. विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दि. १७.४.२०१५ मधील वित्तीय अधिकार, नियम पुस्तिका, १९७८ भाग- पहिला, उपविभाग-दोन, महाराष्ट्र आकस्मिक खर्च नियम, १९६५ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारानुसार व अनु. क्र. २७ अ, नियम क्र. ७६, अन्वये प्रशासकीय विभागाला असलेल्या अधिकारान्वये तसेच वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. अर्थसं- २०२३/प्र.क्र.४०/अर्थ-३, दि. १२.४.२०२३ अनुसार सन २०२३-२४ या वित्तीय वर्षाच्या प्रथम ९ महिन्यांच्या कालावधीसाठी अनिवार्य व कार्यक्रमांतर्गत खर्चाचा अर्थसंकल्पित निधी वितरणास दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०२३१०१११४४७१००१२९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

RUPALI SANJOG KABARE

Digitally signed by RUPALI SANJOG KABARE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT, 2.5.4.20=825ec39543f0d33deccec30f6ca54b1adc430443efec55f07e98dc173423779d, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=5CB43A03D973FF96AABBF02A74864A4681399FE663D8FBDE0441A596BEB3ACDD, cn=RUPALI SANJOG KABARE
Date: 2023.10.11 14:52:54 +05'30'

**( रुपाली कबरे )**

**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन,मुंबई.
२. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान, मंत्रालय, मुंबई.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
९. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
१०. महालेखालपाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर.
११. अधिदान व लेखा अधिकारी, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१३. मे. सुजाता कम्प्युटर्स प्रा. लि., ६६/२, गुरुछाया अपार्टमेन्ट, कर्वे रोड, नल स्टॉप, पुणे-४११००४.
१४. मे. प्राईसवॉटर हाऊस कूपर्स लि., २५२, वीर सावरकर मार्ग, दादर (पश्चिम), मुंबई-४०००२८.
१५. वित्त विभाग (व्यय-७/वित्तीय सुधारणा) मंत्रालय, मुंबई-३२.
१६. सहसचिव, (पोल-१४) गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१७. निवडनस्ती, पोल-३